# मिरा भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.)
ता.जि.ठाणे - ४०११०१ दुरध्वनी क्र. २८१८११८२, २८१९२८२८.

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

दि. ८/१०/२०२१

जा.क्र.मनपा/कर/ ९४८ /२१-२२

प्रति,
मा. सिस्टीम मॅनेजर
संगणक विभाग

विषय :- माजी सैनिकांना देय सवलतीची माहिती सामाजिक माध्यम (Social Media) व्दारे प्रसिध्द करणे बाबत.

संदर्भ :- १) मा. महासभा ठराव क्र. २६ दि. ३०/०७/२०१०.
२) मा. शासन निर्णय क्र.संकिर्ण२०२०/प्र.क्र.१०१/भाग-२/का-२८ दि. २३/११/२०.
३) मा. महासभा ठराव क्र. २१ दि. २३/०६/२०२१

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येत आहे की, मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील माजी सैनिकांना मालमत्ता कराच्या सामान्य करात १००% सवलत देणे बाबत संदर्भ क्र. १ अन्वये ठराव पारीत करण्यात आला असून सदर ठरावाच्या अनुषंगाने माजी सैनिकांना मालमत्ता करात सवलत देण्यात येत आहे.

तथापि, मा. शासन निर्णय क्र.संकिर्ण२०२०/प्र.क्र.१०१/भाग-२/का-२८ दि. २३/११/२० अन्वये माजी सैनिकांना यापुढे मालमत्ता करात सवलत देताना खालील बाबींची पुर्तता करणे बाबतचे निर्देश प्राप्त झाले आहे.

१) लाभार्थी माजी सैनिक हा महाराष्ट्र राज्यात जन्मलेला असावा किंवा महाराष्ट्र राज्याचा किमान १५ वर्षे सलग रहीवासी असावा. त्याकरीता सक्षम प्रधिकाऱ्याकडुन अधिवास प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

२) कर माफीस पात्र ठरणाऱ्या व्यक्तीने संबधित जिल्हयाच्या जिल्हा सैनिक कल्याण अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

३) पात्र व्यक्ती राज्यातील एकाच मालमत्तेकरीता कर माफीस पात्र राहील. तसे घोषणापत्र त्यांनी संबधित जिल्हा सैनिक कल्याण अधिकाऱ्यांना सादर करणे आवश्यक राहील.

४) या योजनेचा लाभ संबधित माजी सैनिक व त्यांच्या पत्नी/ विधवा हयात असेपर्यंतच देय राहतील. तसेच अविवाहीत शहीद सैनिकांच्या बाबत त्यांचे आई-वडील हयात असेपर्यंत हे लाभ देय राहतील.

५) या प्रयोजनासाठी माजी सैनिक याचा अर्थ हा माजी सैनिक (केंद्रीय नागरीक सेवा व पदांवर पुर्ननियुक्ती) सुधारणा नियम, २०१२ मध्ये विहीत केल्याप्रमाणे राहील.

उक्त शासन निर्णयानुसार कार्यवाही करणे बाबत मा. महासभा दि. २३/०६/२०२१ ठराव क्र. २१ अन्वये मंजूरी देण्यात आली आहे.

तरी माजी सैनिकांनी मालमत्ता करात सवलत प्राप्त करुन घेणेकरीता वरील प्रमाणे कागदपत्रांची पुर्तता करावी याबाबत सामाजिक माध्यम (Social Media) व्दारे प्रसिध्द देणेची कार्यवाही आपले स्तरावरुन करण्यात यावी.

(सुदाम गोडसे)
सहा. आयुक्त (कर)
मिरा-भाईंदर महानगरपालिका

प्रत :- माहितीकरीता
मा. उप-आयुक्त (कर)